॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Director, Board of Examination & Evaluation**

Phone: (02462) 229294 | Website: www.srtmun.ac. | E-mail : srtmuncoe@gmail.com

Fax : (02462) 229520 | srtmundboee@gmail.com

संदर्भ : उन्हाळी–2019/परीक्षा/समन्वय/2019–20/2806 दिनांक:14.03.2019

प्रति,

मा.प्राचार्य तथा केंद्र प्रमुख,

सर्व संलग्नीत पदवी/पद्व्युत्तर महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: उन्हाळी –२०१९ परीक्षा पूर्व तयारी बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी–२०१९ पदवी परीक्षा दिनांक १५.०३.२०१९ पासुन सुरू होत आहेत. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आले आहे. उन्हाळी २०१९ परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाय योजना आपल्या परीक्षा केंद्रामार्फत करण्यात याव्यात.

१. उन्हाळी परीक्षा २०१९ साठी परीक्षा केंद्राची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात आली आहे, त्यानुसार परीक्षार्थीसाठीची बैठक व्यवस्था व मनुष्य बळाचे नियोजन करण्यात यावे.

२. परीक्षा केंद्र प्रमुखाची जबाबदारी ही महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी स्विकारणे बंधनकारक असून अपवादात्मक परिस्थितीत इतर शिक्षकांची केंद्रप्रमुख म्हणुन नियुक्ती करण्यासाठी परीक्षा विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे तसेच संवैधानिक जबाबदारी प्राचार्याचीच असेल. परीक्षा केंद्रप्रमुख/प्राचार्याचे नांव, फोन नंबर व ईमेल पत्ता इत्यादी माहिती परीक्षा विभागास srtmundboee@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावी.

३. विद्यापीठ परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून महाविद्यालयीन स्तरावर दोन /तीन सदस्यीय अंतर्गत दक्षता पथकाची नेमणूक करण्यात यावी. त्यामध्ये एक महिला सदस्य असेल.

४. परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त विनामुल्य घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही महाविद्यालयीन स्तरावर करावी.

५. उन्हाळी २०१९ परीक्षेसाठी प्रश्न पत्रिका हया Online E-Delivery मार्फत पाठविण्यात येणार आहे, त्यामुळे E-Delivery of Question Paper Downloading साठी स्वतंत्र गोपनीय कक्ष असणे आवश्यक असून त्यामध्ये अद्यावत संगणक, झेरॉक्स मशीन, प्रिंटर तसेच विद्युतपुरवठा अखंड राहणे करीता युपीएस/जनरेटर इत्यादी साहित्य उपलब्ध ठेवावे.

६. E-Delivery of Question Paper साठी स्वतंत्र गोपनीय कक्षात काम करणारे प्रशिक्षीत अधिकारी, कर्मचारी नेमणूक करून त्यांची नावे परीक्षा विभागास कळवावे. तसेच गोपनीय कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे चालू ठेवणे बंधनकारक आहे.

७. परीक्षा सुरक्षित व कॉपीमुक्त तसेच मोकळया वातावरणामध्ये पार पाडणे संबधीत परीक्षा केंद्राच्या प्रत्येक परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात यावे. जेणे करून परीक्षेदरम्यानच्या गैरप्रकारास आळा बसेल.

८. परीक्षा केंद्रामध्ये परीक्षार्थींना प्रवेश देतांना त्यांची तपासणी करून परीक्षा दालनात प्रवेश देण्यात यावा. परीक्षा दालनात पेपर कॉपी, मोबाईल, कॅलक्युलेटर, इतर परीक्षेसंबधीची यांत्रिक उपकरणे गैरप्रकारासंबधीची साधने

वापरण्यास सक्त मनाई करण्यात यावी. कॉपी, गैरप्रकार करतांना विद्यार्थी आढळून आल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करून ती प्रकरणे परीक्षा विभागाकडे पाठवावीत.

९. ज्या महाविद्यालयात मान्यताप्राप्त प्राचार्य नसतील, आवश्यक सोयी सुविधा नसतील अशा महाविद्यालयाचे केंद्र इतर महाविद्यालयास देण्यात येइल. त्यानुसार बैठक व्यवस्था करावी लागेल. त्यासाठीचा प्रशासकीय खर्च प्रती विद्यार्थी प्रमाणे देय असेल.

१०. दीव्यांग विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सोई/सुविधा संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक ०४ मार्च २०१७ या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. हा शासन निर्णय विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात आलेला आहे. तसेच या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सुचनाही देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करावी.

१०. दीव्यांग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या उत्तरपुस्तिकेवर दीव्यांग विद्यार्थी असा रबरी शिक्का तयार करून घेवून तो शिक्का उत्तरपुस्तिकेवर मारण्यात यावे. या उत्तरपुस्तिका स्वतंत्रपणे पाकिटामध्ये मुल्यांकन केंद्रास पठविण्यात यावेत. तसेच दीव्यांग विद्यार्थ्यांचे महाविद्यालय स्तरावर मुल्यांकन करताना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०१७ नुसार व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मार्गदशक सुचानानुसार कार्यवाही करावी . ;हा शासन निर्णय विद्यापीठ संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

११. दीव्यांग विद्यार्थ्यांसाठी परीक्षा दालन तळमजल्यावर देण्यात यावे. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार सोई सुविधा व लेखणीक वापरण्याची अनुमती द्यावी व एका तासाला २० मिनीट या प्रमाणे अधीकचा वेळ देण्यात यावा. संपूर्ण सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.

१२. शासनाने सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्यामार्फत निर्गमीत केलेले दीव्यांगाचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याकिडून घेवून त्यांना उपरोक्त नमुद सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

कृपया वरील प्रमाणे पूर्वतयारी करावी व सदर माहिती परीक्षा विभागाच्या srtmundboee@gmail.com या इमेल किंवा खास दुतामार्फत किंवा डाकने परीक्षा विभागास पाठवून देण्यात यावी व उन्हाळी २०१९ परीक्षा यशस्वीरित्या पार पाडणेसाठी सहकार्य करावे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ